1) पुढारी पान क्र. 7

दि. 23/01/2023

# पोलीस भरतीसाठी आलेल्या परजिल्ह्यातील मुलांना पाण्याच्या टाकीचा आधार

## राहण्याची व्यवस्था नसल्याने भर थंडीत टाकीखाली काढावी लागली रात्र



१०भाईंदर पाण्याच्या टाकीखाली तसेच झाडेझुडपांमध्ये विश्रांती घेणारी भरतीतील मुले



भाईंदर : राजू काळे

मीरा-भाईंदर, वसई-विरार (एमबीविवी) पोलीस आयुक्तालयांतर्गत ९९६ पदांसाठी २ जानेवारीपासून भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. पोलीस दलात भरती होण्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून मुले व मुली भाईंदरमध्ये येत आहेत. मात्र त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली नसल्याने मुले भरती सुरु असलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानातील पाण्याच्या टाकीखाली ऐन थंडीत रात्र काढताना दिसून येत आहेत. तर काही मुले याच मैदानातील झाडाझुडपांत झोपत असल्याचे दयनीय चित्र पाहावयास मिळत आहे.

एमबीविवी आयुक्तालयांतर्गत एकूण ९९६ पदांसाठी भरती होत असून त्यात चालकांच्या १० पदांचा समावेश आहे. यानुसार पोलीस हवालदार पदासाठी ९८६ पदे उपलब्ध असून त्यासाठी राज्यभरातून एकूण ७३ हजार २२१ अर्ज प्राप्त झाले आहेत. यावरून एका हवालदार पदासाठी सरासरी ७३ अर्ज प्राप्त झाले असून एकूण ९८६ पदांपैकी ३० टक्के पदे महिलांसाठी म्हणजेच २९६ पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. या पदांसाठी महिलांचे एकूण १२ हजार २३२ अर्ज प्राप्त झाले आहेत. हवालदार पदासाठी महिलांची राखीव पदे वगळता पुरुषांकरीता एकूण ६९० पदे जातीनिहाय तसेच इतर प्रवर्गाकरीता उपलब्ध असून या ६९० पदांसाठी एकूण ६० हजार ९८९ अर्ज प्राप्त झाले आहेत. यावरून पुरुषांसाठीच्या एका हवालदार पदासाठी सरासरी ८८ तर महिलांच्या एका पदासाठी सरासरी ४१ अर्ज प्राप्त झाले आहेत. चालकांच्या १० पदांसाठी १ हजार २३७ अर्ज प्राप्त झाले असून त्यात पुरुष उमेदवारांच्या १ हजार १९६ तर महिला उमेदवारांच्या ४१ अर्जांचा समावेश आहे. यावरून चालकाच्या एका पदासाठी पुरुष उमेदवारांचे सरासरी ११९ तर महिलांसाठीच्या एका पदासाठी सरासरी १४ अर्ज प्राप्त झाले आहेत. यातील चालक पदासाठीची भरती प्रक्रिया सुरुवातीलाच पार पाडण्यात आली असून या भरतीसाठी सुरुवातीला मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. हि भरती सध्या भाईंदर पश्चिमकडील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानातच पार पाडली जात असून त्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून मुले येत आहेत.

### मुलांची राहण्याची व्यवस्था करावी

यातील बहुतांशी मुलांना मीरा-भाईंदर शहर नवखे असल्याने त्यांना येथील हॉटेल्स, लॉजिंग-बोर्डिंगमध्ये राहणे न परवडणारे ठरत आहेत. त्यामुळे या मुलांना ऐन थंडीत रात्र काढण्यासाठी मैदानातील पाण्याच्या टाकीचा आधार मिळत आहे. काही मुले मैदानात तसेच तेथील झाडाझुडपांमध्येच रात्रभर विश्रांती घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. मैदानात रात्रीच्यावेळी दव पडत असल्याने तेथे झोपणाऱ्या मुलांचा बिछाना काही वेळेतच ओला होऊन त्यांना नाईलाजास्तव त्यावरच गारठून झोपणे अनिवार्य ठरू लागत आहे. तसेच या मैदानात सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर असल्याने मैदानात रात्र काढणाऱ्या मुलांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे भरतीसाठी येणाऱ्या मुलांची किमान राहण्याची व्यवस्था एमबीविवी पोलीस आयुक्तालयाने पालिकेच्या सहकार्याने करावी, अशी मागणी होऊ लागली आहे.

2) लोकमत पू. पान क्र. 1

### लाचप्रकरणी अटक

मीरा रोड : मीरा रोड पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात आरोपीला अटक करू नये म्हणून दोन लाखांची मागणी करणाऱ्या व्यक्तीला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. तक्रारदार ३४ वर्षीय व्यक्तीविरुद्ध मीरा रोड पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटक न करण्यासाठी या गुन्ह्याचे तपासी अधिकारी व इतर लोकसेवक हे दोन लाखांची लाच मागत आहेत, असे हबीब इब्राहीम रेहमान (३९) याने तक्रारदारास सांगितले होते. याबाबत ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. उपअधीक्षक अश्विनी पाटील यांच्या पथकाने हबीब याला ताब्यात घेतले.

3) लोकसत्ता पृ. पान क्र. 3

दि. 11/01/2023


# नवीन नालासोपारा-विरार रस्ता धोकादायक

## दुभाजक, पथदिव्यांचा अभाव

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** विरार आणि नालासोपारा या शहरांना जोडणाऱ्या नवीन रस्त्यावर पालिकने कोणत्या सोयीसुविधा न पुरवल्याने हा रस्ता धोकादायक बनला आहे. या रस्त्यावर दुभाजक, गतिरोधक आणि पथदिवेही नाहीत. त्यामुळे वाहने भरधाव जात असून, मागील आठवड्यात या रस्त्यावर अपघातात एका लहान मुलाचा मृत्यू झाला होता.

नालासोपारा पश्चिमेच्या श्रीप्रस्थ ते विरारच्या म्हाडा कॉलनीदरम्यान पालिकेने नवीन रस्ता तयार केला आहे. पूर्वी सिडकोने हा रस्ता हस्तांतरित करून त्यावर मुरूम भराव केला होता. मात्र तो वाहतुकीसाठी अनुकूल नव्हता. त्यामुळे तत्कालीन आयुक्त गंगाधरन डी. यांनी पुढाकार घेऊन हा रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला होता. ८ कोटी रुपये खर्चून १५ मीटर रुंद आणि १६०० मीटर (१.६ किलोमीटर) लांब रस्ता तयार करण्यात आला आहे. या रस्त्यामुळे नालासोपाऱ्यावरून विरारला अवघ्या पाच मिनिटांत जाणे शक्य झाले आहे.



**नागरिकांचे आंदोलन :** मागील आठवड्यात बुधवारी या रस्त्यावर कपिल भारती या आठ वर्षांच्या मुलाचा अपघातात मृत्यू झाला होता. तो वडिलांसह रस्त्याच्या कडेला उभा असताना भरधाव जाणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने तो जखमी झाला होता. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे नागरिकांच्या संतापात भर पडली. रविवारी दुपारी नागरिकांनी उत्स्फुर्तपणे रस्ता बंद करून आंदोलन केले. यावेळी या रस्त्यावरून जाणारे वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी आंदोलनकर्त्यांना भेटून दोन दिवसांत रस्त्यावर सर्व सोयीसुविधा पुरविल्या जातील, असे आश्वासन दिले.

या रस्त्यावर डांबरीकरण केल्यानंतर पथदिवे, दिशादर्शक पट्टे, दुभाजक, कॅट आय रिफ्लेक्टर लावण्यात येणार असून, इतर सुविधाही पुरवल्या जातील, असे आश्वासन पालिकेने दिले होते. परंतु, पालिकेने कोणत्याच सुविधा न देता काही दिवसांपूर्वी रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

पालिकेने या रस्त्यावर गतिरोधक आणि दुभाजकही लावलेले नाहीत. पथदिवे नसल्याने रात्री रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य असते. गतिरोधक नसल्याने वाहने भरधाव जातात. या रस्त्याच्या परिसरात वसाहती असल्याने अपघाताची शक्यता आहे.

4) पुढारी पृ. पान क्र. 1

## सिझानच्या अर्जावर आज सुनावणी

नालासोपारा : तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील आरोपी सिझान खान याच्या जामीन अर्जावर आज वसई सत्र न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी सिझान खानच्या जामीन अर्जावर ११ जानेवारीला सुनावणी होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सिझानची न्यायालयीन कोठडी आणखी दोन दिवसांसाठी वाढली आहे. आज न्यायालयात सिझान व तुनीषा या दोघांच्या वकीलांमध्ये झालेल्या युक्तीवादात सिझानच्या वकिलांनी न्यायालयासमोर एक मोठा खुलासा केला आहे. ज्यात तुनीषाने आत्महत्या करण्याआधी ए नावाच्या मित्राशी फोनवरून संभाषण केले होते. सिझानच्या वकिलांनी न्यायालयासमोर सांगितलेल्या या गोष्टीवरून या प्रकरणाला आता एक नवे वळण मिळाले आहे. दरम्यान तुनीषाच्या वकिलांना ए नावाच्या इसमाबाबत पत्रकारांनी विचारणा केली असता त्यावर त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे.

5) पूण्यनगरी पृ. पान क्र. 4

# एसी लोकलचे दरवाजे उघडलेच नाहीत !

## प्रवाशांचा रेल्वे स्थानकात मोटरमनला घेराव



**नालासोपारा :** मुंबईहून विरारकडे जाणाऱ्या एसी लोकलचे सोमवारी रात्री ११.३०च्या सुमारास नालासोपारा रेल्वे स्थानकात दरवाजे उघड गेले नाहीत. त्यामुळे गोंधळ उडाला. भयभीत झालेल्या प्रवाशांनी विरार रेल्वे स्थानकात मोटरमनला घेरले. याचे व्हिडिओ काढून व्हायरल केले. या बाबतची तक्रार काही प्रवाशांनी विरारच्या स्टेशन मास्तरकडे केली आहे. मात्र स्टेशन मास्तरांनी या घटनेचा इन्कार केला असून, गार्डने दरवाजे उघडल्याचे सांगितले.

विरार रेल्वे स्टेशनमध्ये प्रवाशांनी एकच गोंधळ घातला. एसी लोकलचे दार उघडले नाही म्हणून प्रवाशांनी जोरदार राडा केला. मोटरमनला केबिनमध्येच बंद करून ठेवले होते. अखेर पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर मोटरमनची सुटका करण्यात आली आहे. मुंबईकरांना गारेगार प्रवास देणाऱ्या एसी लोकलच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. मात्र विरार स्टेशनवर एक अजब प्रकार घडला. नालासोपारा रेल्वे स्थानकावर गाडी आल्यानंतर दोन ते तीन दरवाजे उघडले नाहीत. त्यामुळे प्रवाशांनी संताप व्यक्त केला. विरार स्थानकावर प्रवाशांनी मोटरमनला घेरले आणि जाब विचारला. प्रवाशांनी मोटरमनला केबिनमध्ये कोंडून टाकले. अचानक झालेल्या गोंधळामुळे मागून येणाऱ्या गाड्या रखडल्या होत्या. अखेर लोहमार्ग पोलीस आणि आरपीएफच्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि प्रवाशांची समजूत काढली.

चर्चगेटवरून विरारच्या दिशेने ही एसी लोकल निघाली होती. पण नालासोपारा रेल्वे स्थानकावर लोकल थांबली. यावेळी दरवाजाच उघडला नाही. त्यामुळे नालासोपाराला उतरणाऱ्या प्रवाशांना उतरता आले नाही. त्यामुळे त्यांना विरार रेल्वे स्थानकात उतरावे लागले होते. या गोंधळाची रेल्वेने दखल घेतली असून, चौकशीचे आदेश दिले आहेत.

CamScanner

दि. 11/01/2023

6) सकाळ पु. पान क्र. 1

# रिक्षा थांबे कोंडीचे हॉटस्पॉट

## मिरा-भाईंदरमध्ये वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मनस्ताप

भाईंदर, ता. १० (बातमीदार) : मिरा-भाईंदर शहरात ठिकठिकाणी असलेले रिक्षा थांबे हे वाहतूक कोंडीसाठी कारणीभूत ठरत आहेत. रिक्षा थांब्यांवर एकाऐवजी रिक्षांच्या दोन रांगा लावणे, थांब्यानुसार रिक्षांची संख्या मर्यादित नसणे, रिक्षाचालकांमध्ये असलेला बेशिस्तपणा यामुळे या रिक्षा वाहतुकीला मोठा अडथळा करत आहेत. त्याचा अन्य वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना मोठा मनस्ताप सोसावा लागत आहे.

प्रत्येकाला रोजीरोटी मिळाली पाहिजे यासाठी रिक्षा परवान्यांबाबत सरकारने उदार धोरण ठेवले आहे. परिणामी शहरात रिक्षांची संख्या वाढतच आहे. सध्या मिरा-भाईंदरमध्ये सात ते आठ हजार रिक्षा धावत आहेत. शिवाय शहराबाहेरून येणाऱ्या रिक्षांची संख्या वेगळी आहे. या रिक्षांना उभे राहण्यासाठी स्वतंत्र जागा नसल्यामुळे शहरात ठिकठिकाणी सोयीनुसार रिक्षा थांबे तयार झाले आहेत. रिक्षा थांबे हे प्रादेशिक परिवहन विभाग, वाहतूक पोलिस व महानगरपालिका यांच्या समन्वयाने निर्माण करायचे असतात, पण मिरा-भाईंदरमध्ये अनेक ठिकाणी कोणतीही परवानगी न घेता रिक्षा थांबे उभारण्यात आले आहेत. शिवाय प्रत्येक रिक्षा थांब्यावर किती रिक्षा उभ्या करण्याची परवानगी आहे, त्याची संख्या या थांब्यांवर स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक आहे, पण बहुतांश थांब्यांवर रिक्षांची संख्या नमूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रत्येक रिक्षा थांब्यावर रिक्षांच्या लांबलचक रांगा लागलेल्या दिसून येत आहेत. रिक्षा थांब्यांवर रिक्षाचालकाने एकाच रांगेत उभे रहाणे अपेक्षित आहे, परंतु ही शिस्त न पाळता अनेक थांब्यांवर रिक्षांच्या दोन ते तीन रांगा लागलेल्या दिसतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे.



भाईंदर : शहरात ठिकठिकाणी असलेल्या रिक्षा थांब्यांवर रिक्षांच्या दोन रांगा लावल्या जात असल्याने परिसरात वाहतूक कोंडी होत आहे.

रेल्वे स्थानक परिसरातील रिक्षांची समस्या सोडवण्यासाठी ठाण्यातील सॅटिस प्रकल्पाच्या धर्तीवर व्यवस्था उभारण्यात येणार आहे. त्याबाबत महापालिकेशी चर्चा झाली आहे. त्याचप्रमाणे शहरात असलेल्या सर्व रिक्षा थांब्यांचा आढावा घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल.
**- रमेश भामे**, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग

### सुट्टीच्या दिवशी अभूतपूर्व कोंडी

भाईंदर पश्चिम येथील मॅक्सस मॉल परिसर अत्यंत वर्दळीचा आहे. पूर्व भागातून येणारी वाहने, मॅक्सस मॉलमधून बाहेर पडणारी वाहने या ठिकाणच्या रस्त्यावर येत असतात. त्यामुळे या रस्त्यावर आधीच वाहनांची संख्या जास्त असते. त्यातच या रस्त्याच्या दोन्ही बाजूला रिक्षा उभ्या राहतात आणि हे रिक्षाचालक कोणतीही शिस्त न पाळता मनमानीपणे रिक्षा वळवत असतात. त्यामुळे सायंकाळच्या वेळी तसेच शनिवार व रविवार या दिवशी या ठिकाणी अभूतपूर्व वाहतूक कोंडी होत असते. भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्थानकानजीक हीच स्थिती आहे.

7) लोकसत्ता पु. पान क्र. 3

# नायजेरियन नागरिकांच्या इमारतीवर कारवाई नाही

## पोलिसांकडून दोनदा पत्रव्यवहार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** नालासोपारा येथे प्रगतीनगर परिसरात एका अनधिकृत इमारतीत अनेक नायजेरियन नागरिक बेकायदा वास्तव्यास होते. या बाबतची माहिती मिळताच तुळींज पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करून ही इमारत रिकामी केली आहे. ही इमारत धोकादायक झाली असल्याने पोलिसांनी दोन वेळा पालिकेकडे ही इमारत जमीनदोस्त करण्यासाठी पत्रव्यवहार केला. मात्र, पालिकेने या इमारतीवर कारवाई केलेली नाही.

नालासोपारा पूर्वेतील प्रगतीनगर परिसरात मोठ्या प्रमाणात नायजेरियन नागरिक अनधिकृत इमारतींत भाड्याने घरे घेऊन राहत आहेत. नालासोपारा, तुळींज पोलिसांनी अनेकदा त्यांच्यावर कारवाई केली आहे. त्यात अनेक नायजेरियन नागरिकांना अमली पदार्थांच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

प्रगतीनगरमध्ये नायजेरियन नागरिकांचे एका अनधिकृत चार मजली इमारतीत वास्तव्य आहे. ही इमारत २० वर्षांहून जुनी असून, पालिकेने ती धोकादायक घोषित केली आहे. तरी अनेकवेळा नायजेरियन नागरिक या इमारतीत राहत होते. पोलिसांनी मागील आठवड्यात या इमारतीत राहणाऱ्या आठ नायजेरियन नागरिकांवर कारवाई करत इमारत रिकामी केली होती. तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी सांगितले की, इमारतीवर कारवाईसाठी पालिकेला दोन वेळा पत्र दिले आहे. तर, पालिकेच्या साहाय्यक आयुक्तांनी या इमारतीची पाहणी केली असून, कारवाई केली जाईल, असे सांगितले.

CS CamScanner

दि० 11/01/2023

8) पुढारी पृ. पान क्र. 2

# नालासोपाऱ्यात वेश्यादलालास अटक

## घरगुती कामाचे आमिष दाखवून बांगलादेशी महिलेला आणले भारतात

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

घरकामाची संधी देण्याचे आमिष दाखवून बांगलादेशी महिलेला भारतात आणून वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या दलाला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी आरोपी रुबेल मंडल व इतर सात वेश्यादलाल यांच्याविरोधात आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नालासोपारा येथील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना नालासोपारा पूर्वेच्या तलाठी कार्यालय समोरच्या सुरज इमारतीतील फ्लॅट क्रमांक २ मध्ये एक बांग्लादेशी वेश्यादलाल रुबेल मंडल हा एका बांगलादेशी महिलेकडून तीच्या इच्छेविरुद्ध वेश्याव्यवसाय करून घेत तिचा शारीरिक छळ करीत असल्याची माहिती ९ जानेवारी रोजी मिळाली. त्याआधारे चौधरी यांनी महिला पंच व कक्षातील कर्मचाऱ्यांसह त्या फ्लॅटमध्ये छापा मारला. त्यावेळी त्यात बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या बांग्लादेशी रुबेल मंडल याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता इतर सात वेश्यादलालामार्फत तो त्या महिलेसह इतर महिलांना वेगवेगळ्या पुरुषांसोबत वेगवेगळ्या ठिकाणी वेश्या व्यवसायासाठी जबरदस्तीने पाठवित असल्याचे निदर्शनास आले.

तसेच तो वेगवेगळ्या ग्राहकांकडून ३ ते ४ हजार रुपये घेवून पिडित महिलेला त्याच्या मोबदल्यात ८०० रुपये देत असल्याची माहिती समोर आली.

९ जानेवारी रोजी पिडीत महिलेला वेश्याव्यवसायासाठी पाठवीत असताना त्या महिलेने त्याला प्रतिकार केला असता त्याने त्या महिलेला मारहाण करून तिचा शारिरिक छळ केल्याची माहिती पिडीत महिलेने पोलिसांना दिली. त्याने पिडीत महिलेला सुमारे तीन वर्षांपूर्वी बांग्लादेशामधून घरगुती कामाचे आमिष दाखवून अवैधरित्या भारतामध्ये आणले होते. तो तिच्याकडून बंगळुरू, मुंबई व नालासोपारा या ठिकाणी बळजबरीने वेश्याव्यवसाय करून घेत होता.

9) पुढारी पान क्र. 7

# मीरारोड येथील एंजल पॅलेस ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई; १० जणांना अटक

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर येथील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाला ९ जानेवारी रोजी मीरारोड येथील सिल्व्हर पार्क परिसरात असलेल्या चंद्रेश ऍकॉर्ड इमारतीत असलेल्या एंजल पॅलेस (खुशी) ऑर्केस्ट्रा बारमध्ये महिला वेटरच्या नावाखाली परवाना नसतांना मुलींकडून नृत्य करवून घेत असल्याची माहिती मिळाली. त्याआधारे कक्षाचे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी बारमध्ये बोगस ग्राहक पाठवून माहितीची सत्यता पडताळली असता त्यात तथ्य आढळून आले. त्याअनुषंगाने रात्री १२ वाजताच्या सुमारास बारवर पोलिसांनी पंचासह धाड टाकली असता त्यात हिंदी गाण्याच्या व वाद्यांच्या तालावर महिला सिंगर अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले.

यासाठी बारचे मालक, चालक, मॅनेजर, कॅशियर, वेटर, पुरुष सिंगर व वादक त्या महिला सिंगर्सना अश्लिल नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना दिसून आले. पोलिसांनी बारचे २ मॅनेजर, १ कॅशियर, १ स्टीव्हर्ड, ५ वेटर्स व १ वादक अशा १० जणांना ताब्यात घेत बारमधील रोख रक्कम ३७ हजार २०० रुपये व इतर मुद्देमाल जप्त केला.

कारवाई दरम्यान पळुन गेलेले स्टीव्हर्ड मनोज श्यामदेव साव (२७), वेटर अनिलकुमार रामदेव सिंह (२५) व बार मालक सत्या शेट्टी रा. ठाणे यांच्यासह ताब्यात घेण्यात आलेल्या १० जणांविरोधात मीरारोड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ चे कलम ३, ८ (१) (२)- प्रमाणे मंगळवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

दि. 11/01/2023

10) म. टा. पू. पान क्र. 1

# नियमभंगात मिरा-भाईंदरकर अव्वल

## गेल्या वर्षभरात एक लाखाहून अधिक वाहनांवर कारवाई; पाच कोटींचा दंड वसूल

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरमध्ये २०२२ या वर्षभरात वाहतूक नियम मोडणाऱ्या एक लाखाहून अधिक वाहनचालकांवर काशिमिरा वाहतूक विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईतून पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. आयुक्तालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या इतर वाहतूक विभागांकडून करण्यात आलेल्या कारवाईच्या तुलनेत ही आकडेवारी मोठी आहे. त्यामुळे वाहतूक नियमभंग करणाऱ्यांमध्ये मिरा-भाईंदरकर अव्वल असल्याचे दिसून येत आहे.

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन केले जावे, या दृष्टीने कारवाईची जबाबदारी काशिमिरा वाहतूक पोलिसांकडे आहे. त्यांच्याकडून वाहतूक नियमांचे महत्त्व वाहनचालकांना पटवून देण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम व इतर विविध उपक्रम राबवले जात आहेत. मात्र त्यानंतरही विना-सीटबेल्ट, विना-हेल्मेट प्रवास करणे, दारू पिऊन वाहन चालवणे व अवैध प्रवासी वाहतूक यांसारखे प्रकार सुरूच आहेत. त्यामुळे शहराच्या मुख्य चौकांमध्ये नियमित नाकाबंदी व टोईंग वाहनांद्वारे फिरती कारवाई केली जात आहे. वाहतूक शाखेमार्फत विशेष मोहिमा राबवून बेजबाबदार वाहनचालकांवर कारवाई केली जात आहे.

मिरा-भाईंदरमध्ये मागच्या वर्षभरात तब्बल एक लाख २६ हजार ४७६ वाहनांवर वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी काशिमिरा वाहतूक विभागाने कारवाई केली आहे. या वाहनचालकांकडून दंड स्वरूपात तब्बल पाच कोटी आठ लाख ९१ हजार



रुपये वसूल करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त दंडवसुली न झालेल्या सुमारे १९ हजार प्रकरणांतून एक कोटी रुपयांची वसूली प्रलंबित आहे.

या व्यतिरिक्त आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या वसई वाहतूक शाखेने ६२ हजार वाहनचालकांवर कारवाई करत, सुमारे अडीच कोटींचा दंड वसूल केला आहे, तर एक कोटींचा दंड वसूल करणे अद्याप बाकी आहे. विरार शाखेने ८३ हजारांहून अधिक वाहनचालकांवर कारवाई करून दीड कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे, यासह दीड कोटींहून अधिक दंड वसूल करणे अद्याप बाकी आहे. काशिमिरा वाहतूक पोलिसांनी केलेली कारवाई व दंडवसुली ही वसई व विरार शाखेच्या तुलनेत अधिक असल्याचे या आकडेवारीवरून दिसत आहे.

**उल्लंघनाची प्रकरणे**

| विभाग | वाहनांवर कारवाई | दंडवसुली | वसुली बाकी |
|---|---|---|---|
| मिरा-भाईंदर | १,२६,४७६ | ५.०८ कोटी | १ कोटी |
| वसई | ६२,००० | २.५५ कोटी | १ कोटी |
| विरार | ८३,००० | १.५ कोटी | १.५ कोटी |

**काशिमिरा वाहतूक शाखेची कारवाई**

| | चालकांवर कारवाई | दंड वसूल (रु.) |
|---|---|---|
| विना हेल्मेट | २,३३४ | ८,५३,००० |
| मद्यपान | २४९ | ४,९५,३०० |
| अवैध वाहतुक | ३०२ | २७,९०,००० |
| सीटबेल्ट न लावणे | २७,४६५ | ५४,९१,२०० |

### मृत्यू घटले

काशिमिरा वाहतूक विभागाच्या हद्दीत २०१५ साली रस्ते अपघातात ८१ मृत्यू झाले होते. त्यानंतर वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी नियमितपणे कडक कारवाई केली जात आहे. त्यामुळे अपघाती मृत्यूंचे प्रमाण घटून गेल्या वर्षी २६ वर आले आहे. हे प्रमाण आणखी कमी करण्याच्या दृष्टीने, कारवाईसह जनजागृतीसाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती काशिमिरा वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे यांनी दिली.



CS CamScanner

लोकमत

# नालासोपाऱ्यात नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** संक्रांत सण जवळ येत असल्याने पतंगांसोबत नायलॉन मांजा विक्री जोरात सुरू झाली आहे. नालासोपारा येथे दोन ठिकाणी दुकानदारांवर कारवाई करण्यात आली आहे.

नालासोपाऱ्यातील जिजाईनगर येथील नवदुर्गा जनरल स्टोअर या दुकानासमोर १६ वर्षीय अल्पवयीन मुलाने सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास शासनाने बंदी घातलेला नायलॉन मांजा विक्री करण्यासाठी जवळ बाळगला होता. त्याच्या ताब्यातून पोलिसांनी सात दोर बंडलासह १,४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दुसऱ्या घटनेत नागिनदासपाडा येथील ओमकार नाका येथे यास्मिननूर मनसुदी (५५) यांनी सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास आठ दोर बंडलासह १,६०० रुपये किमतीचा नायलॉन मांजा विक्रीसाठी जवळ बाळगला होता. पोलिसांनी तो जप्त केला असून दोन्ही आरोपींविरोधात सोमवारी तुळींज पोलिस ठाण्यात पर्यावरण अधिनियम कलमाखाली दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Jan 11, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# ... आणि एसी लोकलचे दरवाजे उघडलेच नाहीत

## गोंधळाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्यांसाठी तांत्रिक बिघाडामुळे गाड्या उशिराने धावणे किंवा रद्द होणे, ही काही नवीन बाब राहिलेली नाही. यामध्ये एका नव्या कारणाची भर पडली आहे. सोमवारी रात्री साडेअकरा वाजता नालासोपारा स्थानकात एसी लोकलचे दरवाजेच उघडले नाहीत. त्यामुळे मोठा गोंधळ झाला होता.

मुंबईहून विरारकडे जाणारी एसी ट्रेन नालासोपारा रेल्वेस्थानकात सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास थांबली. मात्र, त्यावेळी ट्रेनचे दरवाजेच उघडले नाहीत. त्यानंतर एसी लोकल विरार स्थानकात जाऊन थांबली. तेव्हा संतप्त प्रवाशांनी विरार स्थानकात चांगलाच गोंधळ घातला. नालासोपारा स्थानकात दरवाजे न उघडल्याने प्रवाशांची एकच तारांबळ उडाली. भयभीत झालेल्या मीडियावर व्हायरल केले. त्यानंतर ही एसी लोकल विरार स्थानकात थांबली तेव्हा प्रवाशांच्या संतापाचा भडका उडाला. संतप्त प्रवाशांनी एसी लोकलच्या मोटरमनला ट्रेनच्या केबिनमध्ये कोंडून ठेवले. अखेर रेल्वे पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर मोटरमनची सुटका करण्यात आली.

नालासोपारा स्थानकात एसी ट्रेनचे दरवाजे का उघडले नाहीत, याचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. हा प्रकार मोटरमनच्या चुकीमुळे का तांत्रिक बिघाडामुळे घडला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याबाबतची तक्रार काही प्रवाशांनी विरार स्टेशन मास्तरकडे केली आहे. मात्र, विरार स्टेशन मास्तरांनी या घटनेचा इन्कार केला असून, गार्डने दरवाजे उघडल्याचे सांगितले आहे. या गोंधळाची रेल्वेने दखल घेतली असून चौकशीचे आदेश

Hello Vasai
Page No. 3 Jan 11, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# बांगलादेशी महिलेला ढकलले वेश्याव्यवसायात

## आठ जणांवर गुन्हा : एका आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : भारतात अवैधरीत्या राहणाऱ्या एका बांगलादेशी महिलेला नालासोपारा येथे वेश्या व्यवसायात ढकलणाऱ्या आठ आरोपींवर अनैतिक मानवी प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांनी गुन्हा दाखल करत पीडित महिलेची सुटका केली आहे. या आठ आरोपींमध्ये एक बांगलादेशी दलाल असून एका महिलेचाही समावेश आहे.

नालासोपारा येथे वास्तव्यात असलेल्या बांगलादेशातील ३२ वर्षीय महिलेकडून तिच्या मर्जीविरुद्ध हॉटेल व लॉजवर पुरुष ग्राहक पाठवून आठ दलाल वेश्याव्यवसाय करून घेत होते. त्यात तिला अल्प प्रमाणात आर्थिक मोबदला दिला जात होता. सूरज बिल्डिंग येथे एक बांगलादेशी दलाल रुबेल मंडल हा महिलेकडून तिच्या इच्छेविरुद्ध वेश्याव्यवसाय करून घेतो तसेच तिचा शारीरिक छळ करीत आहे, अशी माहिती सोमवारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे कारवाई करून अवैधरीत्या राहणारा बांगलादेशी दलाल रुबेल मंडल याला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी इतर सात वेश्यादलालांमार्फत तो संबंधित महिला व इतर महिलांकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती मिळाली.

### प्रतिकार केल्याने मारहाण

- **सोनू, रमेश ऊर्फ लाला, प्रदीप, राकेश, अजय ठाकूर व अंजली पटेल अशी गुन्हा दाखल झालेल्या सात दलालांची नावे आहेत. हे दलाल वेगवेगळ्या गिऱ्हाईकांकडून तीन ते चार हजार रुपये घेऊन पीडित महिलेला ८०० रुपये देत असत.**
- महिलेला वेश्याव्यवसायासाठी पाठवत असताना तिने त्यास प्रतिकार केल्याने त्याने तिला मारहाण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची माहिती या महिलेने पोलिसांना दिली आहे. आचोळे पोलिस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला अटक करत फरार सात आरोपींचा पोलिस शोध घेत आहे.

Hello Vasai
Page No. 2 Jan 11, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# ५२ वर्षीय महिलेचा केला विनयभंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : नालासोपारा येथे ५२ वर्षीय महिला पाळीव श्वानाला फिरविण्यासाठी गेली असताना विनयभंग झाल्याची घटना समोर आली आहे.

पीडित महिला रविवारी रात्री दीडच्या सुमारास आपल्या पाळीव श्वानाला फिरवण्यासाठी घराशेजारील सार्वजनिक रस्त्यावर गेली होती. यावेळी आरोपीने चारचाकी वाहनातून तिचा पाठलाग करत तसेच अश्लील बोलत तिचा विनयभंग केला होता. सोमवारी नालासोपारा पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 11, 2023
Powered by: erelego.com

दैनिक

# सनसनी अबतक

रखे खबरों की खबर

संपादक : विनोद कुमार तिवारी

वर्ष :12 अंक 47 | मुंबई, बुधवार 11 जनवरी 2023 | RNI NO: MAHHIN/2010/34120 | पृष्ठ -4 | 2₹

# वेश्यावृति व्यापार मामले में बांग्लादेशी व्यक्ति गिरफ्तार

## मना करने पर महिला की आरोपी ने कर दी पिटाई

**वसई** : अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा की टीम ने १ बांग्लादेशी पुरुष वेश्या दलाल को गिरफ्तार करने व एक बांग्लादेशी महिला को वेश्यावृत्ति से मुक्त कराने में सफलता पाई है। यह जानकारी पुलिस ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि यह कार्रवाई पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे (क्राइम ),एसीपी (क्राइम) अमोल मांडवे के मार्गदर्शन मे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिट के पी.आई संतोष चौधरी की टीम ने की है। उक्त कार्रवाई में रेस्क्यू फाउंडेशन कांदिवली ने मदद की है। पुलिस के मुताबिक ९ जनवरी को अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा डिवीजन के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी ने विकी कमरा नंबर ०२ सूरज बिल्डिंग,तलाठी कार्यालय के सामने,नालासोपारा पूर्व में रुबेल मंडल नाम का एक बांग्लादेशी पुरुष वेश्यादलाल एक महिला को उसकी इच्छा के विरुद्ध जबरन वेश्यावृत्ति में लगाता है और उसे शारीरिक रूप






से प्रताड़ित कर रहा है,सूचना के आधार पर,पी. आई/चौधरी ने महिला पंच कर्मचारियों के साथ जाकर छापेमारी की व अवैध रूप से रह रहे वेश्यादलाल नाम के एक बांग्लादेशी व्यक्ति रुबेल मंडल को हिरासत में लिया और पूछताछ की, फिर सात अन्य वेश्यादलाल के माध्यम से सूचना मिली कि वह उक्त महिला व अन्य महिलाओं को जबरन अलग-अलग पुरुषों के पास अलग-अलग जगहों पर देह व्यापार के लिए भेज रहा है,बताया गया कि उक्त वेश्यादलाल अलग-अलग वेश्याओं से ३ से ४ हजार रुपये लेकर पीड़िता को ८०० रुपये देता था, महिला ने बताया है कि ९ जनवरी को जब वह उक्त महिला को जबरन देह व्यापार के लिए भेज रहा था तो महिला ने इसका विरोध किया तो उसने उक्त महिला को पीटा एवं शारीरिक रूप से प्रताड़ित किया.पुलिस ने बताया कि इस मामले में जब पीड़िता से पूछताछ की गई तो उसने बताया कि करीब तीन साल पहले उसे घरेलू काम करने के लिए अवैध रूप से बांग्लादेश से भारत लाया गया था और उसे बेंगलुरु, मुंबई और नालासोपारा में वेश्यावृत्ति के लिए मजबूर किया गया था।हालांकि उक्त वेश्यादलाल के सात अन्य साथियों के खिलाफ आचोले थाने में विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया गया है।

दैनिक
मुंबई, नवीमुंबई, ठाणे, पालघर, भिवंडी व कल्याण से एक साथ प्रसारित
प्रभाव समाचार
संपादकः विशाल सिंह
www.prabhavsamachar.com
● वर्ष : ०८ ● अंक : ११० ● ठाणे, बुधवार 11 जनवरी 2023 RNI No.: MAHHIN/2015/65000 ● पृष्ठ: ८ ● मूल्य २ रु.

# वेश्यादलाल बांग्लादेशी दबोचा गया, वेश्याओं से 3 से 4 हजार रुपये लेकर पीड़िता को 800 रुपये देता था

अजहर शेख : संवाददाता

वसई ; अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा की टीम ने १ बांग्लादेशी पुरुष वेश्या दलाल को गिरफ्तार करने व एक बांग्लादेशी महिला को वेश्यावृत्ति से मुक्त कराने में सफलता पाई है। यह जानकारी पुलिस ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि यह कार्रवाई पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे (क्राइम), एसीपी (क्राइम) अमोल मांडवे के मार्गदर्शन मे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिट के पी.आई संतोष चौधरी की टीम ने की है। उक्त कार्रवाई में रेस्क्यू फाउंडेशन कांदिवली ने मदद की है। पुलिस के मुताबिक ९ जनवरी को अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा डिवीजन के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी ने विकी कमरा नंबर ०२ सूरज बिल्डिंग, तलाठी कार्यालय के सामने, नालासोपारा पूर्व में रुबेल मंडल नाम का एक बांग्लादेशी पुरुष वेश्यादलाल एक महिला को उसकी इच्छा के विरुद्ध जबरन वेश्यावृत्ति में लगाता है और उसे शारीरिक रूप से प्रताड़ित कर



रहा है, सूचना के आधार पर, पी. आई/चौधरी ने महिला पंच कर्मचारियों के साथ जाकर छापेमारी की व अवैध रूप से रह रहे वेश्यादलाल नाम के एक बांग्लादेशी व्यक्ति रुबेल मंडल को हिरासत में लिया और पूछताछ की, फिर सात अन्य वेश्यादलाल के माध्यम से सूचना मिली कि वह उक्त महिला व अन्य महिलाओं को जबरन अलग-अलग पुरुषों के पास अलग-अलग जगहों पर देह व्यापार के लिए भेज रहा है, बताया गया कि उक्त वेश्यादलाल अलग-अलग वेश्याओं से ३ से ४ हजार रुपये लेकर पीड़िता को ८०० रुपये देता था, महिला ने बताया है कि ९ जनवरी को जब वह उक्त महिला को जबरन देह व्यापार के लिए भेज रहा था तो महिला ने इसका विरोध किया तो उसने उक्त महिला को पीटा एवं शारीरिक रूप से प्रताड़ित किया. पुलिस ने बताया कि इस मामले में जब पीड़िता से पूछताछ की गई तो उसने बताया कि करीब तीन साल पहले उसे घरेलू काम करने के लिए अवैध रूप से बांग्लादेश से भारत लाया गया था और उसे बेंगलुरु, मुंबई और नालासोपारा में वेश्यावृत्ति के लिए मजबूर किया गया था। हालांकि उक्त वेश्यादलाल के सात अन्य साथियों के खिलाफ आचोले थाने में विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया गया है।

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-208 मुंबई, बुधवार 11 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# छापेमारी में बांग्लादेशी वेश्यादलाल गिरफ्तार

**वसई :** अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा की टीम ने 1 बांग्लादेशी पुरुष वेश्या दलाल को गिरफ्तार करने व एक बांग्लादेशी महिला को वेश्यावृत्ति से मुक्त कराने में सफलता पाई है। यह जानकारी पुलिस ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि यह कार्रवाई पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे (क्राइम ),एसीपी (क्राइम) अमोल मांडवे के मार्गदर्शन मे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिट के पी.आई संतोष चौधरी की टीम ने की है। उक्त कार्रवाई में रेस्क्यू फाउंडेशन कांदिवली ने मदद की है।




इस मामले में जब पीड़िता से पूछताछ की गई तो उसने बताया कि करीब तीन साल पहले उसे घरेलू काम करने के लिए अवैध रूप से बांग्लादेश से भारत लाया गया था और उसे बेंगलुरु, मुंबई और नालासोपारा में वेश्यावृत्ति के लिए मजबूर किया गया था। उक्त वेश्यादलाल के सात अन्य साथियों के खिलाफ आचोले थाने में विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया गया है।

दैनिक

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई,

# मुंबई केसरी टाइम्स

www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १५ अंक : २१५ बुधवार 11 जनवरी 2023 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 08

# अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा की बड़ी कार्रवाई ; पूर्व इलाके से पकड़ा गया बांग्लादेशी वेश्यादलाल

**वसई** ; अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा की टीम ने 1 बांग्लादेशी पुरुष वेश्या दलाल को गिरफ्तार करने व एक बांग्लादेशी महिला को वेश्यावृत्ति से मुक्त कराने में सफलता पाई है। यह जानकारी पुलिस ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि यह कार्रवाई पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे (क्राइम ),एसीपी (क्राइम) अमोल मांडवे के मार्गदर्शन मे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिट के पी.आई संतोष चौधरी की टीम ने की है। उक्त कार्रवाई में रेस्क्यू फाउंडेशन कांदिवली ने मदद की है।

पुलिस के मुताबिक 9 जनवरी को अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा डिवीजन के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी ने विकी कमरा नंबर 02 सूरज बिल्डिंग,तलाठी कार्यालय के सामने,नालासोपारा पूर्व में रुबेल मंडल नाम का एक बांग्लादेशी पुरुष वेश्यादलाल एक महिला को उसकी इच्छा के विरुद्ध जबरन वेश्यावृत्ति में लगाता है और उसे शारीरिक रूप से प्रताड़ित कर रहा है,सूचना के आधार पर,पी.आई/ चौधरी ने महिला पंच कर्मचारियों के साथ जाकर छापेमारी की व अवैध रूप से रह रहे वेश्यादलाल नाम के एक बांग्लादेशी व्यक्ति रुबेल मंडल को हिरासत में लिया और पूछताछ की, फिर सात अन्य वेश्यादलाल के माध्यम से सूचना मिली कि वह उक्त महिला व अन्य महिलाओं को जबरन अलग-अलग पुरुषों के पास अलग-अलग जगहों पर देह व्यापार के लिए भेज रहा है,बताया गया कि उक्त वेश्यादलाल अलग-अलग वेश्याओं से 3 से 4 हजार रुपये लेकर पीड़िता को 800 रुपये देता था, महिला ने बताया है कि 9 जनवरी को जब वह उक्त महिला को जबरन देह व्यापार के लिए भेज रहा था तो महिला ने इसका विरोध किया तो उसने उक्त महिला को पीटा एवं शारीरिक रूप से प्रताड़ित किया.पुलिस ने बताया कि इस मामले में जब पीड़िता से पूछताछ की गई तो उसने बताया कि करीब तीन साल पहले उसे घरेलू काम करने के लिए अवैध रूप से बांग्लादेश से भारत लाया गया था और उसे बेंगलुरु, मुंबई और नालासोपारा में वेश्यावृत्ति के लिए मजबूर किया गया था।हालांकि उक्त वेश्यादलाल के सात अन्य साथियों के खिलाफ आचोले थाने में विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया गया है।


## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ६ मधील कलम १(१) व १ (२) अन्वये करारनुसार मालमत्ता हस्तांतरण साठी राकेश खुबीलाल जैन यांनी मालमत्ता क्रं. DV/ ०१/३३८, विभाग देवदळ जिल्हा- पालघर येथे अर्ज केला आहे. ही मिळकत युसुफ जे.परमार ह्यांच्या नावे आहे.

ही मिळकत राकेश खुबीलाल जैन ह्यांचे नावे हस्तांतरीत करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कोणाची ही हरकत हित संबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (०७) दिवसांच्या आत वसई-विरार शहर महानगरपालिका विभाग देवदळ कार्यालयात लेखी कळवावे अन्यथा कर वसूलीच्या सोयीसाठी सदर मिळकत हस्तांतरण करून महानगरपालिका दफ्तरी या बाबत नोंद घेतली जाईल.

**दि.** १०/०१/२०२३

**ठिकाण** - देवदळ

**सही/-**

राकेश खुबीलाल जैन

# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची नालासोपारा मोठी कारवाई, पूर्व भागातून बांगलादेशी वेश्या पकडली

**वसई.** अनैतिक मानवी तस्करी सेल नालासोपारा च्या पथकाला १ बांगलादेशी पुरुष वेश्या पकडण्यात आणि एका बांगलादेशी महिलेला वेश्याव्यवसायातून मुक्त करण्यात यश आले आहे.

पोलिसांनी मंगळवारी ही माहिती दिली. पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे), एसीपी (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी तस्करी शाखा नालासोपारा युनिटचे पीआय संतोष चौधरी यांच्या पथकाने ही कारवाई केल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईसाठी रेस्क्यू फाउंडेशन कांदिवलीने मदत केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जानेवारी रोजी अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी, नालासोपारा विभाग, विक्की रुम क्रमांक ०२ सूरज बिल्डिंग, तलाठी कार्यालयासमोर, नालासोपारा पूर्व येथे रुबेल मंडल नावाच्या बांगलादेशी पुरुष वेश्या महिलेवर जबरदस्ती केली. वेश्याव्यवसायात गुंतून तिचा शारीरिक छळ करत आहे, या माहितीच्या आधारे पीआय/चौधरी यांनी महिला पंच कर्मचाऱ्यांसह छापा टाकून रुबेल मंडल नावाच्या बांगलादेशी व्यक्तीला ताब्यात घेतले, बेकायदेशीर वेश्याव्यवसाय करणाऱ्या बांगलादेशी व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, इतर सात वेश्यांमार्फत ही माहिती मिळाली. तो या महिलेला वेगवेगळ्या ठिकाणी आणि इतर महिलांना जबरदस्तीने वेश्याव्यवसायासाठी वेगवेगळ्या




पुरुषांकडे पाठवत होता, या वेश्या वेगळ्या असल्याचे सांगून तो वेश्याव्यवसायांकडून ३ ते ४ हजार रुपये घ्यायचा आणि पीडित महिलेला ८०० रुपये देत असे. त्यांनी सांगितले की, ९ जानेवारी रोजी तो या महिलेला जबरदस्तीने वेश्याव्यवसायासाठी पाठवत होता, तेव्हा महिलेने विरोध केला, त्यानंतर त्याने महिलेला मारहाण केली आणि तिच्यावर अमानुष अत्याचार केला. पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणात जेव्हा पीडितेची चौकशी केली असता तिने सांगितले की, तीन वर्षांपूर्वी तिला बांगलादेशातून बेकायदेशीररीत्या भारतात घरगुती कामासाठी आणण्यात आले आणि बेंगळुरू, मुंबई आणि नालासोपारा येथे जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले गेले.आचोळे येथे विविध कलमांखाली सहकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस चौकी.

# 'तहसीलदार हटाओ, वसई बचाओ' की मांग तेज

■ **निसं, वसईः** पर्यावरण बचाओ समिति की ओर से तहसीलदार कार्यालय के सामने भ्रष्टाचार समेत विभिन्न जन जमस्याओं को लेकर विरोध प्रदर्शन किया गया। संस्था ने 'तहसीलदार हटाओ, वसई बचाओ' का नारा लगाते हुए प्रदर्शन किया।

प्रदर्शन करने वालों ने आरोप लगाया कि जब से उज्ज्वला भगत ने वसई तहसीलदार का पदभार संभाला है, तब से भ्रष्टाचार के मामले बढ़े हैं। सरकारी जमीनों पर अतिक्रमण, रेती का अवैध उत्खनन, मैंग्रोज की कटाई, रॉयल्टी चोरी जैसे कई मामले बढ़ गए हैं। अवैध कारखानों के दूषित पानी को समुद्र में छोड़ना जैसे कई मामले सामने आए है। इससे पर्यावरण को भारी नुकसान पहुंच रहा है। प्रांत अधिकारी स्वप्निल तांगडे ने विरोध प्रदर्शन करने वालों से कहा कि इन सभी मुद्दों पर 27 जनवरी को बैठक होगी। इस अवसर पर श्याम पाटकर, प्रफुल्ल ठाकुर, मेकॅन्झी डाबरे, संजय कोली, जॉन घोन्साल्विस, अमित पवार, निलेश वर्तक, विन्सेंट परेरा समेत कई पदाधिकारी उपस्थित थे।




पर्यावरण बचाओ समिति की ओर से तहसीलदार कार्यालय के सामने भ्रष्टाचार समेत विभिन्न जन जमस्याओं को लेकर विरोध प्रदर्शन किया गया।